# विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर अहवाल

## दिनांक 17 ते 23 डिसेंबर 2024

श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर दिनांक १७ डिसेंबर ते २३ डिसेंबर २०२४ रोजी येरडव मुक्कामी संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन संस्थेचे सरचिटणीस श्री.नरेश पाचलकर यांच्या हस्ते तर सरपंच श्रीमती उज्वला बेर्डे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या कार्यक्रमास राजापूर लांजा तालुका नागरिक संघ मुंबईचे अध्यक्ष श्री सुभाष लाड, सर्व ग्रामपंचायत सदस्य, येरडव ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. उमेश ज्ञा. दळवी आदी मान्यवर होते. दुपारच्या सत्रात ग्रामपंचायत परिसर, दत्त मंदिर परिसर, पाटीलवाडी पिकअप शेड परिसर स्वच्छता करण्यात आली  व नियोजन करण्यात आले. दिनांक १८ रोजी सकाळच्या सत्रात ग्रामपंचायत परिसरात गटर खुदाई करण्यात आली. दुपारच्या सत्रात ज्येष्ठ पत्रकार श्री विनोद पवार यांचे 'कोकणातील व्यवसायाच्या संधी ' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. सायंकाळच्या सत्रात सर्वेक्षण व खेळ घेण्यात आले. दिनांक १९ रोजी सकाळच्या सत्रात बोधिसत्व नगर व वरचा पाठ  या ठिकाणी दोन वनराई बंधारे बांधण्यात आले. दुपारच्या सत्रात जीवन आनंद संस्था मुंबईचे संस्थापक श्री. संदीप परब  यांचे ' युवक आणि सामाजिक बांधिलकी ' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. शुक्रवार दिनांक २० डिसेंबर रोजी सकाळच्या सत्रात पाटीलवाडी व  झांब्याचा पाठ या ठिकाणी दोन वनराई बंधारे बांधण्यात आले तर दुपारच्या सत्रात 'फळबाग रोप निर्मिती आणि व्यवसाय ' या विषयावर समर्थ नर्सरीचे संस्थापक श्री. अमर खामकर यांचे व्याख्यान संपन्न झाले. शनिवार दिनांक २१ रोजी सकाळच्या सत्रात उगवाई ते येरडव अशा ऐतिहासिक पायवाटेची दुरुस्ती करण्यात आली. या पायवाटेवरील ऐतिहासिक शिलालेख, कात्याळात असणारा  झरा, उगवाई मंदिर परिसर स्वच्छता, ऐतिहासिक काळातील असणाऱ्या नाका परिसरात स्वच्छता  करण्यात आली. दुपारच्या सत्रात माता भगिनींसाठी हळदीकुंकू समारंभ संपन्न झाला. रात्रीच्या सत्रात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. राहुल मराठे यांचे 'नाटक आणि मी' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. यावेळी लांजा महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.के. आर. चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.दिनांक २२ डिसेंबर रोजी सकाळच्या सत्रात गांगो मंदिर पायाभरणीचे दगड टाकने, हनुमान मंदिर परिसर स्वच्छता, हनुमानवाडी पिकअप शेड स्वच्छता, सावंतवाडी परिसर स्वच्छता करण्यात आली. यावेळी श्री. अशोक दळवी यांचे टॉयलेट साठी खड्डा खणण्यात  आला. दुपारच्या सत्रात 'पत्रकारिता आणि आजचा युवक ' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार श्री.सुभाष गुडेकर यांचे व्याख्यान संपन्न झाले. रात्री मनोरंजन आणि प्रबोधन यांचा संगम साधणारा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. सोमवार दिनांक २३ डिसेंबर रोजी सकाळच्या सत्रात शोष खड्डे खुदाई करण्यात आली. दुपारच्या सत्रात संस्थेचे सरचिटणीस श्री.नरेश पाचलकर यांच्या अध्यक्षतेखाली समारोप कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी 'स्नेहबंध' हे विद्यार्थ्यांनी सात दिवसातील आपल्या अनुभवांचे केलेल्या लेखनाचे हस्तलिखित मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. या शिबिरात बेस्ट स्वयंसेवक म्हणून भरत गोरुले व बेस्ट स्वयंसेविका म्हणून ऋतुजा पांचाळ यांना गौरवण्यात आले. बेस्ट डायरी लेखनाचा सन्मान निसर्गा धावडे हिने पटकावला. या शिबिरातील सर्व ग्रुप ना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व्ही.एस. पाटील यांनी तर आभार प्रा.एम.डी. देवरुखकर यांनी मानले. अशा प्रकारे सात दिवशीय विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले.